# जाहीर आवाहन

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळांस (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ (POSH ACT) मधील कलम ४ अन्वये ज्या आस्थापनांच्या ठिकाणी **१० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत** असतील अशा सर्व खासगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. ज्या आस्थापनांनी आजतागायत अंतर्गत तक्रार समिती स्थापन केलेल्या नाहीत त्या संबंधित सर्व आस्थापनांवर कायद्यांतील **कलम २६ नुसार ५० हजार रुपये दंडात्मक कारवाई** करण्याची तरतूद कायद्यांमध्ये नमूद आहे. वरील सर्व बाबींची खातरजमा करण्यासाठी अंतर्गत तक्रार समिती स्थापन असल्याची SHE BOX PORTAL वर नोंदणी करण्यासाठी केंद्र शासनाने निर्देश दिलेले आहेत.

**त्या अनुषंगाने SHE BOX पोर्टलवर मुंबई शहर जिल्ह्यांत खासगी आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती नोंदविण्याची कार्यपद्धती खालीलप्रमाणे करावी.**

SHE BOX पोर्टलवर अंतर्गत तक्रार समिती नोंदविण्यासाठी https://shebox.wcd.gov.in या शासकीय वेबसाइटवर जाऊन होम स्क्रीनवर दाखविल्याप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती नोंदवा (Private Head Office Registration) या टॅबवर Click करून आवश्यक त्या सर्व माहितीचा तपशील भरून Submit या Tab वर Click करून अंतर्गत तक्रार समितीची माहिती नोंदविता येईल.

मुंबई शहर जिल्ह्यात SHE BOX पोर्टलवर खासगी आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती नोंदविण्याची कार्यवाही **दिनांक १५ मे २०२५** पर्यंत पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मुंबई शहर यांच्याकडून करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

**शोभा शेलार**

**जिल्हा नोडल अधिकारी तथा,**

**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी**

**मुंबई शहर**

डीजीआयपीआर/२०२५-२६/४८०